# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १४/२०२०** **दिनांक १८/०२/२०२०** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १२/०२/२०२० ते १८/०२/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १९/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून २३/०२/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२/०२ | १३/०२ | १४/०२ | १५/०२ | १६/०२ | १७/०२ | १८/०२ | | १९/०२ | २०/०२ | २१/०२ | २२/०२ | २३/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३६.४ | ३७.१ | ३७.० | ३६.८ | ३७.० | ४०.५ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३५ | ३४ | ३३ | ३२ | ३२ |
| २३.७ | २३.२ | २३.६ | २१.८ | २०.० | २१.७ | - | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २५ | २४ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | १ | ० | १ | २ | ० |
| ८६ | ८६ | ७१ | ७० | ६९ | ८२ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५५ | ५५ | ६५ | ६५ | ६७ |
| ६४ | ५६ | ४८ | ४३ | ५३ | ५१ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | २२ | २० | २३ | २१ | २० |
| २ | १ | २ | २ | ३ | २ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ५ | ४ | ४ | ५ | ५ |
| इ.उ. | इ.उ. | इ. | पु. | इ. | इ.उ. | - | **वाऱ्याची दिशा** | पू. | आ.पू. | आ. | ई.पू. | पू. |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १९ ते २३ फेब्रुवारी २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **फुटवे अवस्था** | • उन्हाळी भात पिकास नत्र खताचा दुसरा हप्ता फुटवे येण्याच्या वेळी (पुनर्लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी) हेक्टरी ८७ कि.ग्रॅ. युरिया देण्यात यावा<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें. मी. नियंत्रित करावी. |
| **आंबा** | **मोहोर अवस्था ते फळधारणा** | • मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे.<br>• **<u>टिप:</u>** फवारणी करताना मोहोर नुकताच फुलत असल्यास आणि फळधारणा झालेली नसल्यास शक्यतो फवारणी फळधारणा होईपर्यंत टाळावी किंवा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास आणि फवारणी करणे गरजेचे असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांचा परागीकरणाचा कालावधी (सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत) वगळून फवारणी करावी.<br>• फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये वाटाणा आकाराच्या अवस्थेत तुडतुड्याचा, फुलकिडीचा आणि भुरी  रोगाचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये, फळगळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाण्याच्या पाळ्या दयाव्यात तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी.<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे. |
| **नारळ** | **-** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी.<br>• पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा तिसरा हप्ता देण्यात यावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे. |
| **फळबाग रोपवाटिका** | **वाढीची अवस्था** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने फळबाग रोपवाटिकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेतील गवत काढून स्वच्छता ठेवावी व गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल. |
| **कुकुटपालन** | - | • दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खादय सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**